


शहरातील रस्त्यांचा सर्वसमावेशक विकास होणे गरजेचे - आयुक्त शेखर सिंह

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | गुरुवार दिनांक 03/07/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 145 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# विकासप्रकल्पांच्या उभारणीसाठी केंद्र सरकारचे संपूर्ण सहकार्य - अजित पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मुंबई : पंधराव्या वित्त आयोगाच्या माध्यमातून राज्यात सुरु असलेल्या विकासप्रकल्पांच्या उभारणीसाठी केंद्र सरकारचे संपूर्ण सहकार्य मिळत आहे. राज्याच्या विकासाची ही कामे पुढील शंभर वर्षांचा विचार करुन आखावीत. नियोजित वेळेत पूर्ण करावीत. सर्व कामे दर्जेदार असतील याची काळजी घ्यावी. केंद्रीय अधिकाऱ्यांशी समन्वय, संपर्क ठेवून पंधराव्या वित्त आयोगाचा सर्व निधी वेळेत उपलब्ध होईल आणि चालू आर्थिक वर्षअखेर खर्च होईल, याद्दष्टीने कार्यवाही करावी. राज्याच्या विकासासाठी मिळणारा एक रुपयाचा निधीही परत जाणार नाही, याची काळजी घ्या, असे स्पष्ट निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.

उपमुख्यमंत्री पवार यांनी पंधराव्या वित्त आयोगाच्या माध्यमातून राज्यात सुरु असलेल्या विविध विकास प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला. 1) भारतीय नौदलातून निवृत्त आयएनएस गुलदार जहाजाचा उपयोग करुन सिंधुदुर्ग जिल्ह्यानजिक समुद्रात कृत्रिम प्रवाळ निर्माण करुन तिथे जागतिक दर्जाचे स्कुबा डायव्हिंग, पाणबुडीचा अनुभव, समुद्रात पाण्याखाली संग्रहालय आदी पर्यटन सुविधांची निर्मिती, 2) नवी मुंबईत उलवे येथे आंतरराष्ट्रीय विमानतळानजिक युनिटी मॉलची उभारणी, 3) नाशिक येथे 'राम-काल-पथ' ची निर्मिती आणि विकास, 4) राज्यातील ठाणे, नागपूर, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर, पिंपरी चिंचवड, कल्याण-डोंबिवली, सोलापूर या सात ठिकाणी नोकरदार महिलांसाठी वसतिगृहांची उभारणी, 5) नगरविकास, ग्रामविकास, आपत्ती व्यवस्थापन, सार्वजनिक आरोग्य आदी विभागांशी संबंधित विविध प्रकल्प आणि विकास योजना, 6) सांस्कृतिक वारसा जतन, 7) वने आणि वन्यजीव व्यवस्थापन, 8) रेवस-रेडी सागरी महामार्ग, 9) पोलिसांसाठी गृहनिर्माण योजना आदी कामांची प्रगती, त्यासाठी निधीची उपलब्धता यासारख्या बाबींचा आढावा घेऊन ही कामे नियोजित वेळेत पूर्ण करण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. ही कामे पूर्ण होण्यातील अडथळे दूर करण्यासाठी शासनाकडून संपूर्ण सहकार्य मिळेल. मात्र कामे वेळेत पूर्ण झालीच पाहिजेत. ती दर्जेदार असली पाहिजेत, असे उपमुख्यमंत्री पवार यांनी बैठकीत सांगितले. त्याअनुषंगाने सूचनाही केल्या.

पंधराव्या वित्त आयोगातून होणारी ही सर्व विकासकामे पुढील शंभर वर्षांचे नियोजन करुन नियोजित वेळेत पूर्ण व्हावीत, सर्व कामे दर्जेदार असतील याची काळजी घ्यावी. केंद्र सरकार राज्याला सर्वतोपरी सहकार्य करीत आहे. त्यांच्याशी समन्वय, संपर्क ठेवून पंधराव्या वित्त आयोगाचा सर्व निधी चालू आर्थिक वर्षअखेर खर्च होईल, याद्दष्टीने कार्यवाही करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री पवार यांनी बैठकीत दिले.

बैठकीला अर्थ विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असिमकुमार गुप्ता, ग्रामविकासचे प्रधान सचिव एकनाथ डवले, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, नगरविकासचे प्रधान सचिव डॉ. के.एच. गोविंदराज, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव संजय दशपुते, वित्त विभागाच्या (वित्तीय सुधारणा) सचिव श्रीमती शैला ए., सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव विरेंद्र सिंह, नाशिकच्या महापालिका आयुक्त मनीषा खत्री, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# राज्यातील विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान - उपमुख्यमंत्री शिंदे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मुंबई : राज्यातील विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याच्या निर्णयावर शासन ठाम असून, संबंधित शाळांनी विहित नियमांची पूर्तता केली असल्यास त्यांना लवकरच पुढील टप्प्याचे अनुदान देण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत दिली.

विधानपरिषद सदस्य किरण सरनाईक यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, राज्यात पूर्वी अनेक शाळांना कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आली होती. मात्र, 2009 नंतर 'कायम' शब्द काढून टाकत टप्प्याटप्प्याने या शाळांना अनुदान देण्याचा मार्ग स्वीकारण्यात आला. 2016, 2018 आणि नंतर 2023 पर्यंत अनेक शाळांना अनुदान दिले गेले असून, आता पुढील टप्प्यातील शाळांसाठी 10 ऑक्टोबर 2024 रोजी बैठक घेण्यात आली आणि 14 ऑक्टोबर 2024 रोजी याबाबतचा शासन निर्णयही काढण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, शाळांना एकाच वेळी संपूर्ण अनुदान देणे शक्य नसले, तरीही टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याचे काम निश्चितपणे पूर्ण करू. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि संबंधित विभागामध्ये चर्चा करून याबाबतचा लवकरच निर्णय घेतला जाईल, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.राज्यमंत्री पंकज भोयर म्हणाले की, अनुदानाचा पुढील टप्पा देण्यास शासन कटीबद्ध असून त्यासाठी लवकरच आर्थिक तरतूद करण्यात येईल.

यावेळी झालेल्या चर्चेमध्ये सदस्य किशोर दराडे, ज. मो. अभ्यंकर, जयंत आसगावकर, राजेश राठोड यांनी सहभाग घेतला.

# आयएमएच्या वतीने "डॉक्टर नागरिक संवाद"

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी (प्रतिनिधी) इंडियन मेडिकल असोशिएशन पिंपरी चिंचवड भोसरी शाखेच्या वतीने वर्षीचा डॉक्टर्स डे चे औचित्य साधून " डॉक्टर नागरिक संवाद", आरोग्य चर्चा सत्र, तपासणी शिबीर या नावीन्यपूर्ण कार्यक्रम दि.५ - ६ जुलै रोजी संत तुकाराम नगर येथील आचार्य प्र के अत्रे नाट्यगृह येथे हा कार्यक्रम होणार आहे. अशी माहिती अध्यक्ष डॉ. ललितकुमार धोका यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

दि.५ जुलै संध्या ४ वा, उदघाटन ज्येष्ठ शास्त्रज्ञ अशोक नगरकर यांच्या हस्ते होणार आहे. संध्या ४ ते ८ या वेळात बाल आरोग्य व महिला आरोग्य यावर नागरिक व तज्ञांची चर्चा सत्रे होणार आहेत.

प्रथमोपचार(फर्स्ट एड वोर्कशॉप)आणि जीवन संजीवणी प्रत्यक्षिक ( सीपीआर डेमोनस्ट्रेशन) कार्यशाळाही घेतल्या जाणार आहेत.

तसेच आधुनिक जीवनशैलीतील तणाव व मानसिक आरोग्य यावर मार्गदर्शन सत्र होणार आहे.

यावेळी नागरिकांकडून प्राप्त प्रश्नांना उत्तरे दिली जातील व शंकांचे निरसन केले जाईल.

दुसरा दिवस - ६ जुलै सकाळी ८ वा दु ३ या वेळेत विविध चर्चा सत्र वा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी लायन्स क्लबचे प्रांतपाल राजेश अगरवाल, रोटरी क्लबचे प्रांतपाल नितीन ढमाले हे उपस्थित राहणार आहे.यामध्ये डोळे, कान -नाक-घसा, सांधेदुखी व हाडांचे आरोग्य, रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग व थायरॉइड यावर चर्चासत्र होईल.

डॉक्टर-रुग्ण संबंध व वेळेनुसार होणारे वैद्यकीय प्रॅक्टिसमधील बदल, ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य समस्या यावरही चर्चासत्र होणार आहे.

प्रबोधनासाठी ग्लोबल टॅलेंट विद्यार्थ्यांचे स्क्रीन टाइम व व्यसनमुक्ती यावर लघुनाटिका सादर करणार आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी भित्तीचित्र स्पर्धा सुद्धा होणार आहे.

गर्भाशयमुखाचा कर्करोग व लसीकरणातून प्रतिबंध यावरही लघु नाटिका डॉक्टर सादर करणार आहे. व हे लसीकरण( एचपीव्ही वॅक्सीन)9 ते 15 वयोगटातील मुलांना व मुलींना मोफत दिले जाणार आहे त्यासाठी नोंदणी आवश्यक आहे. जनतेच्या आरोग्यासाठी कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते संस्थांचा सत्कार होणार आहे.

आलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या मोफत आरोग्याची तपासणी : रक्तदाब, मधुमेह, बीएमआय, बीएमडी वगैरे तपासण्या होणार आहेत.

या कार्यक्रमात जास्तीत जास्त नागरिकांनी व संस्थेचे सभासदानी सहभागी होऊन चर्चासत्रे व कार्यशाळा यांचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेला सचिव डॉ मिलिंद सोनवणे, खजिनदार डॉ प्रकाश रोकडे, कार्य सदस्य डॉ विजय भळगट आदी उपस्थित होते.

# घरफोडी करणारी टोळी गजाआड; 37 लाखांचा मुद्देमाल जप्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



सोसायटीतील बंद सदनिकांची पाहणी करुन घरफोडी करणाऱ्या चोरट्यांच्या टोळीला हडपसर पोलिसांनी गजाआड केले. चोरट्यांकडून सोने-चांदीचे दागिने, मोटार असा ३७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चोरटे घरफोडी करण्यासाठी मोटारीतून फिरायचे. पसार झालेल्या चोरट्यांचा माग काढण्यासाठी ८०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण तपासले होते.गणेश अर्जुन पुरी (वय ३३, रा. मांजरी, मुळ. रा, ममदापुर, लातूर), रवीसिंग शामसिंग कल्याणी (वय २७, रा. रामटेकडी), निरंजनसिंग भारतसिंग दुधाणी (वय ४४, रा. अंबरनाथ, ठाणे) अशी अटक करण्यात आलेल्या चोरट्यांची नावे आहेत.फिर्यादी हे १४ जून रोजी कुटुंबीयासोबत तुळजापूर- अक्कलकोट येथे दर्शनासाठी गेले होते. चोरट्यांनी बंद सदनिकेची पाहणी केली. कुलूप तोडून दागिने आणि रोकड लांबविली होती. याप्रकरणाचा हडपसर पोलिसांकडून तपास करण्यात येत होता. पोलिसांनी सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले होते. पसार झालेले चोरटे मोटारीतून पसार झाले होते.पोलिसांनी ८०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण तपासले. तांत्रिक तपासात आरोपी मुळशी तालुक्यातील लवळे परिसरात असल्याची माहिती मिळाली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 03/07/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# "सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी विकास आराखडा तात्काळ रद्द करावा"

## आमदार अमित गोरखे यांची विधान परिषदेत लक्षवेधी द्वारे ठाम मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नव्या विकास आराखड्याबाबत जनतेमध्ये तीव्र नाराजी असून, हा आराखडा पूर्णतः बिल्डर लॉबीच्या फायद्यासाठी तयार करण्यात आल्याचा गंभीर आरोप आमदार अमित गोरखे यांनी आज विधान परिषदेतील लक्षवेधी सूचनेद्वारे केला. आमदार गोरखे यांनी हा विकास आराखडा तात्काळ रद्द करण्याची जोरदार मागणी करताना, हा आराखडा म्हणजे "जनतेच्या विरोधात आखलेला योजनाबद्ध कट" असल्याचे तीव्र शब्दांत विधान परिषदेत स्पष्ट केले. याचसोबत, संबंधित अधिकाऱ्यांवर व सल्लागारांवर उच्चस्तरीय चौकशी करून त्यांच्यावर निलंबनाची




कारवाई करण्याची मागणीही त्यांनी नगरविकास मंत्री व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली. विधान परिषदेमध्ये लक्षवेधी सूचना मांडल्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना आमदार गोरखे यांनी नव्या डीपी मसुद्यावर जोरदार टीका केली. १९९७ साली तयार झालेल्या शेवटच्या डीपीची अंमलबजावणी अद्याप फक्त ५०% झाली आहे, तरीही नवा डीपी तयार करण्यात आला आहे याचा अर्थसंगत अभ्यासच झालेला नाही. हा डीपी बिल्डर लॉबीच्या फायद्यासाठी आणि सामान्य जनतेच्या हक्कांवर गदा आणणारा आहे. बिल्डरांचे प्लॉट आरक्षणमुक्त ठेवले गेले आहेत, तर गोरगरीब व मध्यमवर्गीय जनतेची घरे मात्र आरक्षणांत अडकवण्यात आली आहेत. महापौर, नगरसेवक व स्थानिक लोकप्रतिनिधी यांचा सहभाग न घेता, प्रशासक राजवटीत राजकीय हेतूने व पारदर्शकतेशिवाय हा आराखडा तयार करण्यात आला आहे. ३०,००० हून अधिक हरकती महापालिकेकडे दाखल असूनही, त्या हरकती प्रशासनाने दुर्लक्षित केल्या आहेत. ग्रीन झोनचे R - झोनमध्ये रूपांतर म्हणजे पर्यावरण व नैसर्गिक समतोलावर घातक आघात आहे.

GIS प्रणालीद्वारे सर्वेक्षण करणाऱ्या HCP कंपनीने अचूकतेचा फज्जा उडवला असून, "हा नकाशा त्यांनी झोपेत तयार केला का?" असा थेट सवाल आमदार गोरखेंनी उपस्थित केला. महापालिकेने परवानगी दिलेल्या इमारतींवर आरक्षण लावणे म्हणजे संबंधित नागरिकांची फसवणूक आहे.

"हा विकास आराखडा म्हणजे गोरगरीब, मध्यमवर्गीय आणि पारंपरिक जमिनीच्या मालकांच्या हक्कांवर गदा आणणारा कट आहे. राज्य शासनाने त्वरित हस्तक्षेप करून हा आराखडा रद्द करावा.

संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ चौकशी लावून दोषी ठरवून निलंबित करावे. अन्यथा, जनता रस्त्यावर उतरेल आणि आम्ही तिच्या सोबत राहू!" असे ठाम मत आमदार अमित गोरखेंनी व्यक्त केले.

# शहरातील रस्त्यांचा सर्वसमावेशक विकास होणे गरजेचे - आयुक्त शेखर सिंह

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहर हे वेगाने विकसित होणाऱ्या महानगरांपैकी एक असून, येथील नागरी समस्यांवर दीर्घकालीन आणि समतोल उपाययोजना राबवण्यावर महापालिकेचा भर आहे. शहरामध्ये केवळ वाहतूक सुरळीत करणे एवढ्यावर रस्त्यांचा विकास मर्यादित न ठेवता, त्या जागा सर्वांसाठी सुयोग्य, सुरक्षित आणि सर्वसमावेशक व्हाव्यात यासाठी एक व्यापक दृष्टीकोन स्वीकारणे गरजेचे आहे, असे मत आयुक्त शेखर सिंह यांनी व्यक्त केले.पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने शाश्वत शहरी गतिशीलता या विषयावरील तीन दिवसीय परिषद व प्रशिक्षण सत्राचे आयोजन चिंचवड येथील ऑटो क्लस्टर येथे करण्यात आले आहे. या सत्राचे उद्घाटन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते आज झाले, त्यावेळी उपस्थितांना



मार्गदर्शन करताना आयुक्त शेखर सिंह बोलत होते.यावेळी लखनऊ महानगरपालिका आयुक्त गौरव कुमार, कानपूर महानगरपालिका आयुक्त सुधीर कुमार, अयोध्या महानगरपालिका आयुक्त जयेंद्र कुमार, सहारनपूर महानगरपालिका आयुक्त सिपू गिरी, उत्तर प्रदेश शहरी रस्ते विकास विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी अरविंद कुमार श्रीवास्तव, नाशिक महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, कार्यकारी अभियंता सुनील पवार, अभिमान भोसले, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी सुधीर बोरुडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह विविध महानगरपालिकांचे अधिकारी व अभियंते उपस्थित होते.आयुक्त शेखर सिंह म्हणाले, रस्त्यांचे नियोजन करताना अनेकदा वाहतूक कोंडी, वाहनांच्या सोयी यावरच लक्ष केंद्रित केल जाते. मात्र, रस्ते केवळ कार व दुचाकींसाठी नसतात. रस्त्यांवर पादचारी, सायकलस्वार, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, दिव्यांग असे अनेक घटक असतात. या सर्व घटकांसाठी रस्ते सुरक्षित असणे हे आपल्या शहराच्या विकासातील मूल्यमापनाचे लक्षण आहे. म्हणूनच सर्व रस्त्यांना समान न्याय मिळणे गरजेचे आहे. फुटपाथ बांधणे किंवा रस्ते रुंद करणे हा फक्त एक भाग आहे. प्रत्यक्षात 'अर्बन स्ट्रीटस्केप' आणि 'हरित सेतू' सारखे उपक्रम हे शहरातील सार्वजनिक जागा अधिक आनंददायी, सक्रिय आणि सर्वसमावेशक बनवण्यासाठी महत्त्वाचे आहेत. रस्त्यांवरील जागा चालणाऱ्यांसाठी, खेळणाऱ्या मुलांसाठी, सायकल चालवणाऱ्यांसाठी अशा प्रत्येकासाठी असायला हवी. या सौंदर्यीकरणासाठी नव्हे तर सर्वसमावेशकतेसाठी केलेल्या उपाययोजना आहेत, असेही आयुक्त सिंह यावेळी म्हणाले.

यावेळी महापालिकेच्या विविध प्रकल्पांची माहिती संगणकीय सादरीकरणाद्वारे उपस्थितांना देण्यात आली.

त्यामध्ये वास्तुविशारद प्रसन्न देसाई यांनी हरित सेतू, आयटीडीपीचे प्रांजल कुलकर्णी यांनी अर्बन स्ट्रीट स्केप, कनन विजय यांनी इंटग्रेटेड कमांड कंट्रोल सेंटर, प्रतापसिंह भोसले यांनी रस्ते वाहतूक नियोजन, सर्वसमावेशक रस्ते रचना आणि विकास ठाकर यांनी बांधकाम नियोजन या विषयांवर आधारित प्रकल्पांची माहिती संगणकीय सादरीकरणाद्वारे दिली.

# पडद्यावर बघून अवाक होण्यापासून ते स्वत: पडद्यावर येणे - हितेश भारद्वाज

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वेधक कथानक आणि अनपेक्षित कलाटण्या यामुळे सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवर नुकत्याच सुरू झालेल्या 'आमी डाकिनी' मालिकेने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. कोलकाताच्या सुंदर पार्श्वभूमीवरील कथानक असलेली ही मालिका या वाहिनीसाठी एक आकर्षक, आगळेवेगळे कथानक घेऊन आली आहे. पूर्वी 'आहट' मालिकेत अनुभवलेला थरकाप प्रेक्षक आता पुन्हा या मालिकेतून अनुभवू शकतील. या मालिकेत हितेश भारद्वाज अयानच्या भूमिकेत आहे, तर शीन दास आणि राची शर्मा अनुक्रमे डाकिनी आणि मीरा यांच्या भूमिका करत आहेत.



आपला उत्साह शेअर करताना अभिनेता हितेश भारद्वाज म्हणतो, "आहट मी लहानपणी आवर्जून बघायचो. त्यातील शांतता आणि अचानक येणारा थरार यांचे मला आकर्षण वाटत असे. मला भीती वाटायची पण ती मालिका बघवीशीही वाटायची." तो पुढे म्हणतो, "माझ्या चुलत भावंडांसोबत ही मालिका बघितल्याचे मला आठवते आहे. आम्ही सगळे जण एका पांघरूणात गुरफटून बसायचो. भीती वाटत नाही असे दाखवायचो, पण प्रत्येक आवाजाला दचकायचो. या आठवणी मनात आजही जिवंत आहेत."

तो पुढे म्हणतो, "तशाच प्रकारची ऊर्जा असणाऱ्या एका मालिकेत आता मी स्वतः काम करत आहे, ही भावना स्वप्नवत आहे. पलंगावर बसून टीव्हीवर मालिका बघणारा एक लहान मुलगा आता प्रत्यक्ष टीव्हीच्या पडद्यावर आला आहे. त्यामुळे माझ्यासाठी ही फक्त एक भूमिका नसून त्याला व्यक्तिगत भावनेचा स्पर्श आहे. मी साकारत असलेला अयान म्हणजे एक गुंतागुंतीचे व्यक्तिमत्व आहे. तर्कनिष्ठा आणि अंतःस्फूर्ती, तर्क आणि मान्यता यांच्या कात्रीत तो सापडला आहे. त्याची भूमिका करताना मनातील अव्यक्त, अबोध भीतीचा सामना मी करत आहे. काही भावनिक भीती, आंतरिक लढा यांच्याशी सामना होत आहे. यामुळेच हे पात्र मला खूप जिवंत वाटते." बघा, 'आमी डाकिनी' दर सोमवार ते शुक्रवार रात्री ८:०० वाजता फक्त सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजन आणि सोनी लिव्हवर

# शेखर चिंचवडे युथ फाऊंडेशन वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहरातील शेखर चिंचवडे युथ फाऊंडेशन गेली अनेक वर्ष इयत्ता १०वी आणि १२वी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आणि मार्गदर्शन शिबीर आयोजित करतात. याही वर्षी ग.दि. माडगूळकर नाट्यगृहात गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला, सदर सन्मान चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी प्रसिद्ध वक्ते प्रा.डॉ. विनोद बाबर सर तसेच शिक्षण मंडळाचे मा. सभापती नाना शिवले सर यांनी विद्यार्थ्यांना आगामी शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरक मार्गदर्शन केले. तसेच, सर्व विद्यार्थी व पालकांशी संवाद साधत विद्यार्थी व बालकांचा सन्मान करून पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. याप्रसंगी हा स्तुती उपक्रम राबविल्याबद्दल शेखरअण्णा चिंचवडे यांचे मनापासून कौतुक केले.यावेळी करुणाताई चिंचवडे, सचिन चिंचवडे, नामदेव ढाके, तात्या आहेर, बिभीषण चौधरी, कविताताई दळवी, पल्लवीताई मारकड, दिलीप गडदे, तृप्तीताई मोरे, वीणाताई कुटे, शशिकांत पाटील, निलेश भोंडवे, निलेग मरळ, ह.भ.प. दत्ताभाऊ चिंचवडे, कुंदाताई गडदे, संदीप शिवले, संदीप चिंचवडे, आबासाहेब पडवळ, नाना शिवले, सुधीर चिंचवडे, तानाजी चिंचवडे, हाके सर तसेच विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# महापालिकेच्या अग्निशामक जवानांमुळे मुक्या जीवाला मिळाले जीवनदान!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : रावेत गावठाण बीआरटीजवळील शाळेसमोरील कन्स्ट्रक्शन साईटवरील खोल खड्ड्यात पडलेल्या गायीला सुखरूप बाहेर काढून पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशामक जवानांनी मुक्या जीवाला जीवनदान दिले आहे. ही कामगिरी पिंपरी, थेरगाव व प्राधिकरण अग्निशमन केंद्रांच्या बचाव पथकाने पार पाडली.रावेत गावठाण बीआरटीजवळील शाळेसमोरील कन्स्ट्रक्शन साईटवरील खोल खड्ड्यात एक गाय पडली आहे, अशी माहिती मिळताच पिंपरी, थेरगाव व प्राधिकरण अग्निशमन केंद्रांमधून बचाव पथक तत्काळ घटनास्थळी रवाना करण्यात आले.पथकाने घटनास्थळी पोहोचून पाहणी केली असता, सदर खड्डा अंदाजे ५०x५० फूट लांबीचा आणि ३५ ते ४० फूट खोल होता. पावसामुळे संपूर्ण भाग चिखलमय झालेला होता. अशा कठीण परिस्थितीत खड्ड्याच्या निसरड्या व चिखलयुक्त परिसरामुळे क्रेन थेट खड्ड्याजवळ नेणे शक्य नव्हते. मात्र क्रेनच्या बूमचा वापर करून व होज आणि दोराच्या साहाय्याने अग्निशामक जवानांनी गायीला दोन बेल्ट लावले. साधारण अर्धा तासाच्या प्रयत्नांनंतर गायीला सुरक्षितरित्या खड्ड्यातून बाहेर काढण्यात आले.



सहआयुक्त तथा अग्निशमन विभागप्रमुख मनोज लोणकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामगिरी अग्निशमन अधिकारी गौतम इंगवले व लिडिंग फायरमन सारंग मंगळूरकर, फायरमन काशिनाथ ठाकरे, सौरव इंगवले, अजय कटारनवरे, विकास पांढरे, विवेक वाघमोडे, शुभम जगताप आणि ऋषिकेश सावंत यांनी केली.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 03/07/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पिंपळे सौदागर मध्ये 'महाराष्ट्रातील एकमेव वेस्ट टू वंडर वर्ल्ड थीम पार्क'

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत





पिंपरी चिंचवड शहरातील आपल्या पिंपळे सौदागर येथील राजमाता जिजाऊ उद्यान येथे महापालिकेच्या वतीने महाराष्ट्राला हेवा वाटावा असे महाराष्ट्रातील एकमेव वेस्ट टू वंडर वर्ल्ड थीम पार्क साकरण्यात येत आसून, जगातील ७ आश्चर्य असणाऱ्या वास्तु व इतर ऐतिहासिक वास्तु या स्मारकाच्या स्वरूपात येथे साकरण्यात येत आहे, हे थीम पार्क बनवताना टाकवू पासून टिकावू या मटेरियल चा वापर करून हे थीम पार्क साकरण्यात येत आहे, या थीम पार्क मध्ये एकूण १७ ऐतिहासिक वास्तु असणार आहेत, अशी माहिती मा.विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी दिली.त्यात जगातील ७ आश्चर्य असणारे ताज महल, आयफेल टॉवर, बुर्ज खलिफा, लीनिंग टॉवर ऑफ पिसा, सिडनी ऑपेरा हाऊस, अजंता कव्ह, ला सागराडा फॅमिलीया, चिचेन इतजा, पीरामीड ऑफ गिझा, पेट्रा ऑफ जोर्डन, कोलोसियम ऑफ रोम, बिग बेन ऑफ लंडन, अकोर वट ऑफ कंबोडिया, हंपी चारियट, स्टॅच्यू ऑफ लिबरटी, ट्रेव्ही फाउंटन, माऊंट रश्मोर. इत्यादी वस्तु साकरण्यात येणार आहे या संपूर्ण थीम पार्क साठी एकूण ११.०२ कोटी रुपये इतका खर्च करण्यात येणार आहे, पिंपळे सौदागर येथे साकरण्यात येणारे हे थीम पार्क महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री आजितदादा पवार साहेब संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली होत आहे, हे वेस्ट टू वंडर वर्ल्ड थीम पार्क महाराष्ट्रातील एकमेव पार्क आसून यामुळे पिंपरी चिंचवड शहरातील वैभवात भर पडणार आहे तसेच हे वेस्ट टू वंडर वर्ल्ड थीम पार्क पूर्ण झाल्यास महाराष्ट्रातील पर्यटन स्थळ होणार आहे यात काही शंका नाही.

हे थीम पार्क लवकरच पूर्ण होवून नागरिकांसाठी खुले होणार आहे, अशी माहिती संबंधित विभागाचे अधिकारी यांच्याशी झालेल्या मीटिंग मध्ये तसेच नाना काटे यांनी कामाचा पाहणी वेळी दिली.

# डॉ.बाबा कांबळे यांना लोकराजे छत्रपती शाहू महाराज पुरस्कार!




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : गोरगरीब कष्टकऱ्यांचे नेते डॉ. बाबा कांबळे यांना मंगळवार २ जुलै २०२५ रोजी पत्रकार भवन, पुणे येथे यंदाचा लोकराजे छत्रपती शाहू महाराज पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाल सबनीस यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला! रिक्षा चालक, फेरीवाले, बांधकाम मजूर, साफसफाई कामगार, घरकाम करणाऱ्या महिला, कागद-कचपत्रा वेचक महिला आणि असंघटित कामगारांसाठी महाराष्ट्र रिक्षा पंचायत आणि कष्टकरी कामगार पंचायत यांच्या माध्यमातून अथक कार्य करणाऱ्या डॉ. बाबा कांबळे यांच्या सामाजिक योगदानाचा यथोचित सन्मान या सोहळ्यात झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर होते, तसेच स्वागत अध्यक्ष लताताई राजगुरू (नगरसेविका), कार्यक्रमाचे आयोजन महामाता रामामाई भिमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारक समिती मुख्य समन्वयक विठ्ठल दादा गायकवाड यांनी केले. या वेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायत चे नेते विलास लेले, पिंपरी चिंचवड महानगरपालिका फेरीवाला समिती सदस्य आशा कांबळे, महाराष्ट्र रिक्षा पंचायत पुणे शहराध्यक्ष मोहम्मद भाई शेख कार्याध्यक्ष विलास पाटील वरिष्ठ उपाध्यक्ष संजय शिंदे ज्येष्ठ सल्लागार कुमार शेट्टी, सचिव अविनाश वाडेकर उपाध्यक्ष प्रवीण शिखरे , संघटक निशांत भोंडवे, संघटक, विल्सन मस्के, अंथोनी फ्रान्सिस अण्णा, आनंद वायदंडे, अमीर हमजा, अल्ला बकश शेख, मध्यवर्ती विभाग अध्यक्ष विजय पाटील व त्यांचे सर्व सहकारी, इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# वाकड-हिंजवडी परिसरातील रस्त्यांची दयनीय अवस्था

## तात्काळ दुरुस्तीची विशाल वाकडकर यांची मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



हिंजवडी आयटी पार्ककडे जाणाऱ्या प्रमुख प्रवेशद्वारांपैकी एक असलेल्या वाकड परिसरातील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था नागरिकांच्या आणि आयटी अभियंता वर्गाच्या दैनंदिन जीवनात अडथळा ठरत आहे. भुजबळ चौक, भूमकर चौक, ताथवडे,पुनावळे या भागांतील रस्त्यांवर तसेच महामार्गालगतच्या सेवा रस्त्यांवरही मोठ्या प्रमाणावर खड्डे निर्माण झाले असून, त्यामुळे वाहतुकीस अडथळा येत असून अपघातांचाही धोका वाढला आहे या भागातून दररोज हजारो वाहनचालक, आयटी अभियंते स्थानिक नागरिक प्रवास करतात. पण रस्त्यांची ही अवस्था पाहता थोड्या अंतराचा प्रवास करण्यासाठीही नागरिकांना तासन् तास वाहतूक कोंडीत अडकावे लागत आहे. परिणामी, नागरिकांचा अमूल्य वेळ आणि मानसिक स्वास्थ्याचे गंभीर नुकसान होत आहे या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे युवा नेते विशाल वाकडकर यांनी महापालिका प्रशासनाचे तात्काळ लक्ष वेधून घेतले असून, एन एच ए आय आणि महानगरपालिका यांनी संयुक्तपणे आपापल्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांची युद्धपातळीवर डागडुजी आणि दुरुस्ती करावी तसेच वाहतूक कोंडीचा कायमस्वरूपी उपाय शोधावा, अशी मागणी केली आहे विशाल वाकडकर म्हणाले, “हिंजवडी हे देशातील एक महत्वाचे आयटी हब आहे आणि वाकड हे त्याचे प्रवेशद्वार. परंतु येथील रस्त्यांची अवस्था पाहता कोणत्याही सन्मानित शहरास लाजवणारी आहे. या समस्यांकडे दुर्लक्ष करणे म्हणजे सामान्य जनतेच्या आणि आयटी यशस्वीतेच्या विरोधात जाणे होय.” रस्त्यांची दर्जेदार कामे, सायंकाळी आणि सकाळच्या वेळेतील वाहतूक नियोजन, सिग्नल सुधारणा, आणि अंडरपासमधील जलनिकासी व्यवस्था यावर तातडीने काम होणे गरजेचे आहे, असेही त्यांनी सांगितले.

या परिसरातील रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत स्थानिक नागरिक, सोसायट्या, वाहतूक पोलीस आणि संबंधित विभागांनी एकत्र येऊन ठोस कृती आराखडा तयार करावा, अशी मागणीही त्यांनी केली.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968